| | ॲड. आकाश विजयकुमार चिखलीकर रा. आकाश साईबाबा मंदिराजवळ मित्रनगर शिवाजीचौक ता. जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत खोपेगांव ता. जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०१.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०३ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०८.३.२०२३ | ग्रा. पं. आर्थिक व्यवहार व कारभाराबाबत माहिती मिळणे |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण व चुकीची दिलेली आहे. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगात द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये अपुर्ण व चुकीची माहिती दिली असल्याचे कारण नमुद केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडुन नेमकी कोणती माहिती चुकीची व अपुर्ण मिळाली आहे. याबाबत जन माहिती अधिकारी

यांना कळवावे. अपिलार्थी यांनी अपुर्ण व चुकीची माहिती बाबत कळविल्यानंतर पुढील १५ दिवसात विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत खोपेगांव ता. जि. लातूर यांनी अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज विचारात घेऊन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह ०३ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./५६३० ते ५६३२ / 81 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. १९ | द्वितीय अपील क्रं. ५९२६/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विकास तुकाराम वायाळ<br>रा. मु. पो. भिसे वाघोली ता. जि. लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्रामपंचायत भिसे वाघोली ता. जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )**

अपिलार्थी यांनी दिनांक १२.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०८.३.२०२३ | ग्रापं च्या दक्षिण दिशेस असलेली मोकळी जागा कोणत्या कागदपत्राने ग्रा पं. च्या नांवावर करुन घेतली त्या कागदपत्राची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. मात्र यासंदर्भात अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती आयोगाने निर्देशीत केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी यानात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी निर्देश दिलेले आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत भिसे वाघोली ता. जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./५९२६/२०२३ | 82 दि. 7/1/2025

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. २० | द्वितीय अपील क्रं. ६१३१/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सय्यद शरीफ युनुस रा. मुरुड ता. जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्रामपंचायत कार्यालय, मुरुड ता. जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक २२.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १५.६.२०२३ | ग्रामनिधी स्टेटमेंट संदर्भात |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्या करीता आज रोजी सोबत आणलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी ती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे. ही बाब विचारात घेता विचाराधीन अपील निर्णय काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६१३१/२०२३ / 83 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. २२ ते २४ | द्वितीय अपील क्रं. ६५७० ते ६५७२/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बालाजी काशीनाथ शिंदे<br>रा. शेकापूर ता. उदगीर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्राम पंचायत शेकापूर ता. उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०९.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३)अन्वये ०३ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २३.३.२०२३ | १. मौजे शेकापूर येथील मालमत्ता क्रं. ४०४, ८०, ६४, ४८५ घरपट्टी पाणीट्टी, विजकर संदर्भात व सदर मालमत्ता कोणत्या कागदपत्राच्या आधारे करण्यात आले आहे, कायदेविषय सल्लागार संबधित माहिती<br>२. कायदेविषयक सल्लागार यांची निवड केल्या संबधित ग्रा पं ठराव इत्यादी<br>३. मालमत्ता क्रं. ४०४, ८०, ६४, ४८५ संबधित नामांतर कोणत्या कागदपत्राच्या आधारे करण्यात आली आहे याबाबत माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. मात्र यासंदर्भात अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती आयोगाने निर्देशीत केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी यानात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी निर्देश दिलेले आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत शेकापूर ता. उदगीर जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम७(६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती उदगीर जि. लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह ०३ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६५७० ते ६५७२/२०२३ | 84 दि. 7/1/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. २५ | द्वितीय अपील क्रं. ३२५७/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. व्यंकट सोपान येलमटे<br>रा. देवर्जन ता. उदगीर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्राम पंचायत देवर्जन ता. उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )**

अपिलार्थी यांनी दिनांक १२.५.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १७.१०.२०२२ | व्यंकट सोपान येलमट्टे व सोपान संग्राम येलमटे यांच्या नावे ग्रा पं. ला नोंद असलेली ८ अ उतारा इ. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे ही विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद विचारात घेता विचाराधीन अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./३२५७/२०२३/ 85 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. २६ | द्वितीय अपील क्रं. ३९८०/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गुरुनाथ बाबु भालेराव<br>रा. मु. पो. मलकापुर ता. उदगीर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्रामपंचायत मलकापुर ता. उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक २२.६.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २०.३.२०२३ | हिरकनबाई भालेराव यांचे घर न. १३७ मा.क्र. १३२ चे पुर्वीचे एकुण क्षेत्र याची माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. मात्र यासंदर्भात अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती आयोगाने निर्देशीत केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी यानात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी निर्देश दिलेले आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्रामपंचायत मलकापुर ता. उदगीर जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद

असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम७(६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती उदगीर जि. लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./३९८०/२०२३ | 86 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. २१ | द्वितीय अपील क्रं. ६७३३/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. पाटील राजीव दामोदर<br>रा. हरीभाऊ नगर कृपासदन रोड ता. जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी<br>पंचायत समिती लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक १६.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १२.७.२०२३ | ग्रापं मधील दलितवस्ती व १४ व्या वित्त आयोगामार्फत झालेल्या कामाची माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन देणे विषयी निर्देश दिलेले आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पंचायत समिती कार्यालय लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली पाहिल्या

विषयाची व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी पंचायत समिती लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६७३३/२०२३ / 87 दि. 7/1/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
# माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. २७ ते ३१ | द्वितीय अपील क्रं. ५२४२ ते ५२४६/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. राजकुमार नरसिंग सुर्यवंशी<br>रा. नळगीर ता. उदगीर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत नळगीर ता. उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )**

अपिलार्थी यांनी दिनांक २१.८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०५ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अपील क्रमांक | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|
| ५२४२/२०२३ | १३.१२.२०२२ | गावातील २५० बेघरांच्या यादीप्रमाणे त्यांचेकडे उपलब्ध जागेचे नमुना नं. ८. अ चा उतारा व कबाल्याची प्रत |
| ५२४३/२०२३ | १३.१२.२०२२ | सर्वे नं. २८६ ही जमीन कोणत्या कामाकरिता संपादित करण्यात आली आहे. याचा संपुर्ण तपशील संपादित दिनांक व आदेशासहित |
| ५२४४/२०२३ | १३.१२.२०२२ | ग्रापंचे मागील तीन वर्षाचे खर्चाचे वार्षिक अंदाजपत्रक व चालुवर्षाचे अंदाजपत्रक त्यानुसार झालेला खर्च पावत्यासह |
| ५२४५/२०२३ | १३.१२.२०२२ | सर्वे नं. २८६ मध्ये झालेले बेघर लोकांचे अतिक्रमण काढण्यासाठी किती पोलीस सांगितले होते त्यांच्या नावासह मोबाईल नंबर |
| ५२४६/२०२३ | १३.१२.२०२२ | गावात किती बेघर लोक आहेत याची खरी माहिती देण्यात यावी व ते लोक केव्हापासुन बेघर आहेत त्याची माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी दिनांक १३.१२.२०२२ रोजी माहितीचे ५ अर्ज कार्यालयास सादर करुन विस्तृत कालावधीची व मोघम स्वरुपाची माहिती मागविली आहे. अपिलार्थी एकाच तारखेत अनेक माहिती अर्ज करुन जन माहिती अधिकारी यांना त्रास देण्याच्या उद्देशाने माहिती मागतात अपिलार्थी मोठया प्रमाणावर माहिती अर्ज करत असल्याने त्यांचा दैनंदिन कामकाजावर परिणाम होत आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी केलेल्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थी यांनी विस्तृत कालावधीची व मोघमपणे माहिती मागविली असल्याचे दिसुन येते. याअनुषंगाने आजरोजी सुनावणीवेळी अपिलार्थी यांना मागणी केलेल्या माहितीमुळे कोणते व्यापक जनहित साध्य होऊ शकते याबाबत विचारणा केली असता यासंदर्भात अपिलार्थी कोणतेही समर्थनिय उत्तर देऊ शकले नाहीत. ही बाब विचारात घेता अपिलार्थी यांचे अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०५ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./५२४२ ते ५२४६/२०२३ / 88 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३२ | द्वितीय अपील क्रं. ५४१३/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. संजीव संग्राम आवळे<br>रा. मु. पो. बनशेळकी ता. उदगीर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत बनशेळकी ता. उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )**

अपिलार्थी यांनी दिनांक २८.८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०१.३.२०२३ | दावनगाव रस्ता हा सिमेंट कॉक्रीट रस्ता गाव नकाशाप्रमाणे करणेसाठी केलेल्या अर्जावर काय कार्यवाही केली |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद व सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./५४१३/२०२३ / 89 दि. 7/1/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ३३ ते ३४ | द्वितीय अपील क्रं. ५४२९ व ५४३०/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. भानुदास पांडुरंग मानकरी<br>रा. मु. पो. बनशेळकी ता. उदगीर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्रामपंचायत बनशेळकी ता. उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक २८.८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १६.५.२०२३ | ग्रामसडक योजनेअंतर्गत मंजुर असलेल्या उदगीर ते बनशेळकी- शेकापूर रस्त्यावर अतिक्रमण बाबत. |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद व सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./५४२९ व ५४३०/२०२३ / 90    दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३५ | द्वितीय अपील क्रं. ७१६१/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हनमंत माधवराव बिरादार<br>रा. नेत्रगाव पो. बनशेळकी ता. उदगीर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>पंचायत समिती कार्यालय उदगीर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी<br>पंचायत समिती उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १८.७.२०२३ | ग्रा पं ला २०१६ ते २०२३ वर्षात प्रत्येक वर्षाला किती निधी मंजुर झाला त्याचा खर्च निधी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद व सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि-अ.क्रं./७१६१/२०२३ / 91 दि. 2/1/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

| |
|---|
| राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,<br>बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या<br>पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१ |

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३६ | द्वितीय अपील क्रं. ७७२३/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विजयकुमार गुरुनाथ पवार<br>रा. सोमनाथपुर ता. उदगीर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्रामपंचायत सोमानाथपुर ता. उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०१.१२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २५.९.२०२३ | चंदर वैजापूरे व श्रीदेवी वैजापूरे यांनी अतिक्रमण केलेल्या जागेत बांधकाम परवाना इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये विस्तृत व मोठी माहिती मागविली असल्याने अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करणे विषयी दि. २७.९.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविण्यात आले होते. मात्र अपिलार्थी माहितीचे अवलोकन करण्यास कार्यालयात आले नाहीत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहितीचे अवलोकन करणे विषयी सुचित केलेले आहे. मात्र अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन केलेले नाही. यावरुन अपिलार्थी यांना माहिती मध्ये स्वारस्य नसल्याचे दिसुन येत असल्याने अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७७२३/२०२३ / 92 दि. 7/1/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ३७ | द्वितीय अपील क्रं. २४१४/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गट्टे बालाजी जाधव<br>रा. मु. पो. दगडवाडी पो. किनगाव ता. अहमदपुर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,<br>ग्राम पंचायत दगडवाडी ता. अहमदपुर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ११.४.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी (प्रतिनिधी) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०७.११.२०२२ | ग्रामरोजगार सेवक म्हणुन नेमणूक केलेल्या ग्रामरोजगार सेवकाच्या ठरावाची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असल्याने त्यांचे समाधान झाले आहे, असे दि. २७.६.२०२३ रोजी लेखी निवेदन दिले आहे.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद व सादर केलेले कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./२४१४/२०२३ / 93 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ३८ ते ४० | द्वितीय अपील क्रं. ७१७६, ७१७७ व ७१७९/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. केंद्रे धर्मराज सदाशिव<br>रा. आनंदवाडी काळेगांव ग्रुप ग्राम पंचायत ता. अहमदपुर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,<br>ग्रा. पं. आनंदवाडी काळेगांव ग्रुप ग्राम पंचायत ता. अहमदपुर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०३ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २६.७.२०२३ | काळेगाव-काळेवाडी (आनंदवाडी) ग्रा. पं. संदर्भातील माहिती मिळणे बाबत |
| ०.६.७.२०२३ | २०१८ ते आजपर्यंत झालेल्या संपुर्ण कामाची एम बी. प्रत मिळणे बाबत. |
| ०६.७.२०२३ | २०१८ ते आजपर्यंत मासिक बैठकीची तपशीलवार माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद व सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०३ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७१७६, ७१७७ व ७१७९/२०२३/ 94 दि. 7/1/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४१ ते ४४ | द्वितीय अपील क्रं. १६५७ , १६५८, १६६० व १६६२/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. चत्रभुज भाऊराव सोमवंशी<br>रा. मु. पो. मोटेगांव ता. रेणापूर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>ग्रामसेवक ग्राम पंचायत मोटेगांव<br>ता. रेणापूर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>विस्तार अधिकारी पंचायत,<br>पंचायत समिती रेणापूर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०६.३.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०४ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अपील क्रं. | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|
| १६५७/२०२३ | २६.९.२०२२ | ग्रामपंचायत न. नं. ८ मालमत्ता नोंदवही बाबत. |
| १६५८/२०२३ | २६.९.२०२२ | जगनाथ आलुरे ते नागनाथ कसबे यांच्या घरापर्यंतच्या सिमेंटरोड कामाबाबत |
| १६६०/२०२३ | २६.९.२०२२ | पंतप्रधान/रमाई/शबरी योजनेच्या घरकुलाबाबत. |
| १६६२/२०२३ | २६.९.२०२२ | ग्रामसभा इतिवृत्तंता बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. प्रकरणी अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची मागविलेली असल्याने अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती अधिनियमाचे कलम २(J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तीक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत मोटेगांव ता. रेणापूर जि. लातूर यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन एक वर्ष कालावधीच्या माहितीचे अवलोकन द्यावे. सदर अवलोकनाच्यावेळी नेमक्या कोणत्या एक वर्ष कालावधीची माहिती हवी आहे, याबाबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना अवगत करावे. त्यानुसार अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी पंचायत, पंचायत समिती रेणापूर जि. लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह ०४ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१६५७,१६५८, १६६० व १६६२/२०२३/ 95 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४५ | द्वितीय अपील क्रं. १६६३/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. चत्रभुज भाऊराव सोमवंशी<br>रा. मु. पो. मोटेगांव ता. रेणापूर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती रेणापूर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती रेणापूर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक १८.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २६.९.२०२२ | प्राप्त तक्रार अर्जावर केलेल्या कारवाई बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती रेणापूर जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये

नमुद माहितीच्या अनुषंगाने सद्यस्थिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती रेणापूर जि. लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./१६६३/२०२३ / 96 दि. 7/1/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ४६ | द्वितीय अपील क्रं. ६३५९/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. निळकंठेश्वरी रामहरी चव्हाण<br>रा. पानेगाव ता. रेणापूर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>पंचायत समिती कार्यालय रेणापूर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,<br>पंचायत समिती रेणापूर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ३०.६.२०२३ | जि. प. लातूरचे पत्र दि. ११.४.२०२३ च्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल |

आजरोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपीलाच्या प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही असे नमुद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय रेणापूर जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद नमुद माहितीच्या अनुषंगाने सद्यस्थिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती रेणापूर जि. लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६३५९/२०२३/97 दि. 7/1/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ४७ | द्वितीय अपील क्रं. ५९११/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. अंगद गुणवंतराव कांबळे<br>रा. तेलगांव ता. अहमदपुर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक सरकारी वकील,<br>जिल्हा सरकारी वकील कार्यालय लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा सरकारी वकील,<br>जिल्हा सरकारी वकील कार्यालय लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ११.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचेतर्फे ॲड एस. जे. गायके उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १४.६.२०२३ | माझे फिर्यादी प्रकरणी ६ वे न्यायालयाच्या आदेशाने नि. फौ. खटला क्रं. ७१/२०२० मधील कलम २०२ प्रमाणे याकामी लातूर पोलीस स्टेशनकडुन केलेला तपास व पोलीसांनी न्यायालयात सादर केलेला अहवाल इत्यादी बाबत ६ मुद्यांवर माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती ही सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता यांच्या कार्यालयाशी संबधित असल्याने सदर माहिती सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता लातूर यांचेकडे उपलब्ध होईल असे दिनांक २५.७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविले आहे. तसेच अपिलार्थी यांनी प्रथम अपील दाखल केलेले नाही, त्यामुळे प्रथम अपिलाच्या अनुषंगाने कार्यवाही करता येणे प्रथम अपिलीय अधिकारी यांना शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपील अप्राप्त असल्याचे आयोगास अवगत केले आहे. याअनुषंगाने अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपिलासोबत सादर केलेल्या प्रथम अपिलाचे अवलोकन केले असता, सदर प्रथम अपील अपिलार्थी यांनी नोंदणीकृत टपालाद्वारे

सादर केले असल्याचे व तशी पोस्टाची पावती सोबत सादर केली असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांच्या युक्तीवादात तथ्यांश दिसुन येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनामध्ये सहायक सरकारी वकील यांच्या कार्यालयाकडुन कसलीही माहिती प्राप्त झालेली नाही. असे नमुद केले आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त माहिती अर्जातील माहिती कार्यालयाशी संबधित नसेल तर मागणी केलेली माहिती ही ज्या विभागाशी/ प्राधिकरणाशी संबधित असेल त्या विभागास/प्राधिकरणास माहिती अर्ज, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधी कलम ६(३) नुसार जास्तीत जास्त ५ दिवसाच्या आत वर्ग करणे आवश्यक आहे. याप्रकरणी संबधित जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अर्ज वर्ग केल्याचे दिसुन येत नाही. प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार सुसंगत हस्तांतरण झाले नसल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय असलेली माहिती ज्या विभागाकडे /प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे ती त्या विभागाकडुन /प्राधिकरणाकडुन कलम ५ (४) नुसार एकत्रित/संकलित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी, या निष्कर्षप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक सरकारी वकील, जिल्हा सरकारी वकील कार्यालय लातूर यांनी वर नमुद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती संबंधित विभागाकडुन/प्राधिकरणाकडुन अधिनियमातील कलम ५(४) नुसार एकत्रित/संकलित करुन अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध द्यावी. जी माहिती देय होत नाही किंवा उपलब्ध करुन देता येत नाही त्याबाबत वस्तुस्थितीसह अपिलार्थीस कळविण्यात यावे.
२. जिल्हा सरकारी वकील, लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.
३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./५९११/२०२३ | 98 दि. 7/1/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ४८ व ४९ | द्वितीय अपील क्रं. ६३२० व ६३२४/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हरीष भगवान भोईटे<br>रा. सर्व्हे नं. ४७/३ लेन नंबर २ गणेश नगर वडगांव शेरी पुणे | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक<br>जिल्हा न्यायालय, लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश वर्ग-१,<br>जिल्हा व सत्र न्यायालय इमारत मेनरोड लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )**

अपिलार्थी यांनी दिनांक २८.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ३०.३.२०२३ | श्री. हरीश भोईटे यांचे गोपनीय अहवाल इत्यादी |
| ऑनलाईन अर्ज | मा. उच्च न्यायालय पत्र दिनांक २८.२.२०२२ इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या दोन माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. २९.४.२०२३ व दि. १८.५.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिसाद देऊन नियमानुसार देय असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती/ माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली असुन माहिती अर्जातील काही मुद्याची माहिती कलम ८(१) (ई) अन्वये नाकारण्यात आली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.३०.६.२०२३ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसून येत नाही.

**आदेश**

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६३२० व ६३२४/२०२३/ ९९ दि. ७/१/२०२५

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
# माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५० ते ५२ व ५५ | द्वितीय अपील क्रं. ४८८२, ४८८४, ४८८५ व ६४९३/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. एन. व्ही. काटकळंबेकर रा. श्री. सेवा हॉस्पीटलच्या पाठीमागे घर नं. एन डी १ डब्ल्यु, १०/५ सिडको नवीन नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबडेकर सामाजिक न्यायभवन शिवनेरी गेट समोर, मार्केट यार्ड ता. जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण प्रादेशिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबडेकर सामाजिक न्यायभवन शिवनेरी गेट समोर, मार्केट यार्ड ता. जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.८.२०२३ व ०६.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०४ द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याने अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असल्याने त्यांचे समाधान झाले आहे; असे दि. ०३.१२.२०२४ रोजी लेखी निवेदन दिलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद व सादर केलेले कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

उपरोक्त ०४ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४८८२ ते ४८८५ व ६४९३/२०२३ / 100 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५३ | द्वितीय अपील क्रं. ६३४९ /२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बब्रुवान नागनाथ आरदवाड<br>रा. वंजरवाडी पो. खंडाळी ता. अहमदपुर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,<br>प्राथमिक आश्रमशाळा नाईकनगर ता. अहदमपुर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त,<br>समाजकल्याण कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचेवतीने ॲड. एस. एन. रोडगे , जन माहिती अधिकारी (प्रतिनिधी) व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ५.७.२०२३ | श्री. विठ्ठल आरदवाड शिक्षक यांची रजा व हलचल रजिस्टर, उन्हाळी व दिवाळी सुट्टी अर्जित रजांची माहिती इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, यांनी आयोगासमोर कथन केले माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. मात्र यासंदर्भात अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती आयोगाने निर्देशीत केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी यानात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २८.८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना सुचित केलेले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमजबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा नाईकनगर ता. अहदमपुर जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलनिर्णयाद्वारे आदेशित केलेली माहिती अपिलार्थी यांना अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६३४९/२०२३/ 101 दि. 7/1/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५४ | द्वितीय अपील क्रं. ६३५० /२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बब्रुवान नागनाथ आरदवाड<br>रा. वंजरवाडी पो. खंडाळी ता. अहमदपुर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा ढाळेगाव<br>ता. अहदमपुर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक आयुक्त,<br>समाजकल्याण कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०३.१०.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचेवतीने ॲड. एस. एन. रोडगे व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ५.७.२०२३ | श्री. गडमवार कोंडिबा विठ्ठल शिक्षक यांची रजा व हलचल रजिस्टर, उन्हाळी व दिवाळी सुट्टी अर्जित रजांची माहिती इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दिनांक २८.८.२०२३ रोजी सुनावणी घेऊन माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना सुचित केलेले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमजबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा ढाळेगाव ता. अहदमपुर जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलनिर्णयाद्वारे आदेशित केलेली माहिती अपिलार्थी यांना अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय, लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६६५०/२०२३ / 102 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ५६ | द्वितीय अपील क्रं. ७४१४/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सोमनाथ दादाराव डाके<br>रा. तांबरी विभाग बार्शी रोड ता. जि. धाराशीव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त,<br>समाजकल्याण कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक उप आयुक्त<br>समाजकल्याण कार्यालय,लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक २०.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २०.७.२०२३ | प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपील क्रं. १/२०२३ प्रकरणात दिलेला निर्णय आणी अपिलार्थीने दिनांक ६.४.२०२३ रोजी दिलेल्या अर्जावर आपण काय कार्यवाही केली त्यांची सत्यप्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमाने जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना प्रथम अपील क्रं. १/२०२३ प्रकरणात दिलेल्या निर्णयाची प्रत दि. २१.८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज प्राप्त होतात. विद्यार्थ्याचे प्रत्यक्ष अर्ज कार्यालयाकडे येत नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज संबंधित महविद्यालयाकडे वर्ग केलेला आहे. त्यानुसार संचालक, डी. बी. इन्सिटयुट ऑफ मॅनेजमेंट महाळंग्रा ता. चाकूर यांनी दि. ७.३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाची वैयक्तीक असल्याने देता येणार नाही असे कळविले आहे. त्याची एक प्रत अपिलार्थी यांना दिलेली आहे. तसेच अपिलार्थी यांच्या दि. ६.४.२०२३ रोजी दिलेल्या अर्जावर करण्यात आलेल्या कार्यवाही बाबत अपिलार्थी यांना दि. २६.४.२०२३ अन्वये अवगत केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद सादर केलेले कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७४१४/२०२३ / 103 दि. 7/1/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
# माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ५७ ते ५९ | द्वितीय अपील क्रं. ४०८८ ते ४०९०/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. हंसराज गोविंदराव भुरे<br>द्वारा ए. डी. कुलकर्णी घर नं. ४८ सुंदरनगर कैलास लॉड्रीच्या<br>बाजुला नागेश्वरवाडी ता. जि. छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक<br>भुमी अभिलेख कार्यालय, उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ३०.६.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०३ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अपील क्रमांक | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|
| ४०८८/२०२३ | ०७.२.२०२३ | मौ. लोहारा ता. उदगीर येथील जमिनीबाबतची माहिती |
| ४०८९/२०२३ | ११.३.२०२३ | मौ. लोहारा ता. उदगीर येथील जमिनीबाबतची माहिती |
| ४०९०/२०२३ | १०.२.२०२३ | मौ. लोहारा ता. उदगीर येथील जमिनीबाबतची माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ०८.३.२०२३ रोजी प्रतिसाद देऊन मागणी केलेल्या माहितीचा बोध होत नाही असे अपिलार्थी यांना कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. १८.७.२०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी अपिलार्थी सुनावणी करिता अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनामध्ये अर्धवट माहिती दिली असल्याने मा. दिवाणी न्यायालय उदगीर येथे सुरु असलेल्या दिवाणी दाव्यावर त्याचा विपरित परिणाम होत असल्याचे नमुद केले असल्याने अपिलार्थी अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती अधिनियमाचे कलम २(J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तीक ठरेल.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, उदगीर जि. लातूर यांना आदेशित करण्यात येते की, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसात अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थीस तारीख व वेळ निश्चित करुन अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणाऱ्या माहितीचे अवलोकन द्यावे. अवलोकनांती, अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांपर्यंतची माहिती अपिलार्थी यांना कलम ७(६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पृष्ठांपेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, उदगीर जि. लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह ०३ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४०८८ ते ४०९०/२०२३/104 दि. 7/1/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
# माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ६० | द्वितीय अपील क्रं. ४६९५/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सुर्यवंशी शेषेराव ग्यानोबा<br>रा. मु. पो. संगम ता. देवणी जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, देवणी जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक<br>भुमी अभिलेख कार्यालय, देवणी जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक २१.७.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २७.३.२०२३ | मौ. संगम येथील शिट क्रं. १ चालता क्रं. १४९ या गावठाण खुली जागेची सनद कोणत्या पुराव्या आधारे दिले आणी ड्रोन द्वारे सर्व्हे करणाऱ्या पदाधिकाऱ्याचे पद व कोणत्या प्रवर्गातुन नौकरी मिळवली |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांना माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिनांक १८.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आजरोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपिलाच्या प्रयोजनामध्ये त्यांना अपुर्ण माहिती मिळाली असल्याचे नमुद केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. अपिलार्थी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडुन नेमकी कोणती माहिती अपुर्ण मिळाली याबाबत जन माहिती अधिकारी यांना कळवावे.

अपिलार्थी यांनी अपुर्ण माहिती बाबत कळविल्यानंतर पुढील १५ दिवसात विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, देवणी जि. लातूर अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज विचारात घेऊन अधिनियमानुसार देय असलेली उर्वरित माहिती अपिलार्थीस कलम ७(६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, देवणी जि. लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४६९५/२०२३ / 105 दि. 7/1/2025

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६१ | द्वितीय अपील क्रं. ४७०१- डी/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. विठ्ठलराव व्यंकटराव बंडगर<br>रा. हलगरा ता. निलंगा जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निलंगा जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निलंगा जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक २१.७.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचेवतीने ॲड. महेश उबाळे, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०३.४.२०२३ | श्री. मठपती आणी लांडे मिळकत क्रं. ८८२ मध्ये वरील दोघांची जागेच्या नकाशा व रजिस्ट्री नोंद माहे किंवा नाही |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी चुकीची दिलेली आहे. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि. ४.७. २०२३ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपिलार्थी यांनी आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपिलाच्या प्रयोजनामध्ये सि. स. नं. ८८२ ची चुकीची माहिती दिली ग्रा. पं. ८८२ चा सि. सं. नं. काय आहे, असे नमुद केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निलंगा जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी परिपुर्ण माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निलंगा जि. लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४७०१- डी/२०२३/706 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६२ व ६३ | द्वितीय अपील क्रं. ४७७६- ई व ४७७७ इ/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. निळकंठ रामहरी चव्हाण<br>रा. मु. पो. पानेगांव ता. रेणापूर जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ३०.७.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये ०२ द्वितीय अपील दाखल केलेले आहेत. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ३०.१.२०२३ व ६.३.२०२३ | कार्यालया अंतर्गत कार्यरत असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्याची माहिती व कलम ४ ख ची माहिती |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. मात्र यासंदर्भात अपिलार्थी यांना हवी असलेली माहिती आयोगाने निर्देशीत केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी यानात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

आजरोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपीलाच्या प्रयोजनामध्ये माहिती मिळाली नाही असे नमुद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये

नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४७७६- ई व ४७७७ इ/२०२३/107 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६४ | द्वितीय अपील क्रं. ४७७६ डी /२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रमेश माणिकराव भडीकर<br>रा. शाहुनगर वि. प्रा. शाळेजवळ विवेकानंद चौक ता. जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक २४.७.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ३०.१२.२०२२ | मौजे भडी येथील आपल्य कार्यालया तर्फे घेण्यात आलेल्या नोंदीची पत्रिका |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांचे माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. ५.९.२०२३ रोजी प्रतिसाद देऊन मागणी केलेली आखीव पत्रिका संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घ्यावे असे कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद व सादर केलेले कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४७७६ डी /२०२३/ 108 दि. 7/1/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६५ | द्वितीय अपील क्रं. ६०४५/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. लक्ष्मण दशरथ पाटील<br>रा. एन-९ एच-१६४/०३ अहिंसारोड श्रीकृष्णनगर टी. व्ही. सेंटर चौकाजवळ सिडको, छत्रपती संभाजीनगर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, उदगीर जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक १८.९.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २०.६.२०२३ | १९६६ कलम १४३ खाली रस्ता मोजणी करुन हद्दी खुणा कायम करुन देणे बाबत इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०.७.२०२३ रोजी प्रतिसाद देऊन नेमकी कोणती माहिती पाहिजे याचा उल्लेख नाही. त्यामुळे माहिती देता येत नाही असे अपिलार्थी यांना कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजुर केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात आजरोजी सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या जोडपत्र-अ नुसार आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अद्याप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही, असे आयोगास अवगत केले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, उदगीर जि. लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र-अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती/ माहिती संदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, उदगीर जि. लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./६०४५/२०२३ / 109 दि. 7/1/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
# माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ६६ | द्वितीय अपील क्रं. ७२२६/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. सिध्देश्वर शिवाजी सोळुंके<br>रा. मु. पो. येळणुर ता. निलंगा जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निलंगा जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, निलंगा जि. लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०७.११.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २०.७.२०२३ | २०२२-२३ मधील ड्रोनने केलेल्या मोजणी बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १८.८.२०२३ प्रतिसाद देऊन माहिती अर्जातील काही मुद्याची माहिती देऊन गावाची अंतिम कार्यवाही झालेनंतर गाव नकाशाची व मिळकत रजिस्टरची नक्कल पुरविण्यात येईल असे अपिलार्थी यांना कळविले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांना दि. ११.१२.२०२४ रोजी नकाशाची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तीवाद व सादर केलेली कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./७२२६/२०२३/ ११० दि. 7/1/2025

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ६७ | द्वितीय अपील क्रं. ८०४३/२०२३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. जोकार महेश वसंतराव<br>रा. रामकृष्ण कॉलनी, उंबरे कोठा ता. जि. धाराशीव | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक १५.१२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये, द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १०.७.२०२३ | सीटीसी नं. १०२९१ मध्ये नामातंरासाठी दि. २०.४.२०२३ रोजी दिलेल्या अर्जाबाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी आयोगासमोर कथन केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतरही जोडपत्र-अ द्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अदयाप पर्यत उपलब्ध करुन दिलेली नाही. तरी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देणे विषयी जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात यावेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. १५.१०.२०२४ रोजी प्रतिसाद देऊन जिल्हाधिकारी मुंद्राक शुल्क लातूर यांचेकडील मुद्रांक शुल्क भरणा करुन शुल्क भरणा केलेले कागदपत्रे सादर करणे विषयी कळविले आहे.

प्रस्तुत प्रकरणात उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपिलार्थी यांना माहिती देणे बाबत जन माहिती अधिकारी यांना सुचित केले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./८०४३/२०२३ / ।।। दि. 5/11/2025

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ६८ | द्वितीय अपील क्रं. ८२४२/२०२३ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रमेश माणिकराव भडीकर<br>रा. शाहूनगर विजया प्राथमिक शाळे समोर ता. जि. लातूर | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधिक्षक<br>उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक २६.१२.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १२.९.२०२३ | वेबसाईटवर मौ. भडी हे गाव कोणत्या महिन्यात व कोणत्या तारखेला टाकले त्याबाबतची प्रत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कथन केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील फेटाळले आहे.

आजरोजी अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. मात्र त्यांनी आयोगात सादर केलेल्या द्वितीय अपीलाच्या प्रयोजनामध्ये मिळकत पत्रिकेची ऑनलाईन न होताच झाली असे दाखून चुकीची दिले असे नमुद केलेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना त्यांच्या जोडपत्र- अ मध्ये

नमुद असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी परिपुर्ण माहिती अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार विनामुल्य नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, लातूर यांनी आयोगाकडील उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशासह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जावक क्र./द्वि.अ.क्रं./८२४२/२०२३ / 112 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| | |
|---|---|
| बोर्ड क्रं. ७० | द्वितीय अपील क्रं. ३०९९/२०२२ |

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बालाजी पुंडीलकराव लंगोटे<br>रा. मु. पो. वळग ता. देगलूर जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक<br>पोलीस स्टेशन मरखेल ता. देगलूर जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय देगलूर जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )

अपिलार्थी यांनी दिनांक ०४.४.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, अनुपस्थित आहेत.जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| २८.१.२०२२ | आपल्या पोलीस स्टेशन अंतर्गत सगळीकडे बसविलेल्या सी. सी. टी. व्ही कॅमेऱ्याचे दि. १९.१.२०२२ रोजी सायंकाळी रात्री ७ ते ८ च्या दरम्यानचे फुटेज मिळणे बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, सी. सी. टी. व्ही. फुटेज उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना दि. २७.२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. सदर माहितीने समाधान झाले असल्याबाबत अपिलार्थी यांनी दि. ११.१२.२०२४ च्या पत्रान्वये कळविले असल्याने अपील निकाली काढण्यात यावे अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगसमक्ष केलेला युक्तीवाद व सादर केलेले कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./३०९९/२०२२/ 113 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७१ | द्वितीय अपील क्रं. ४४०/२०२२ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वैभव ज्ञानोबा धनवे<br>रा. मु. पो. दापका गुंडोपंत ता. मुखेड जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा स. पोलीस निरीक्षक<br>पोलीस स्टेशन मुक्रमाबाद ता. मुखेड जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय देगलूर जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

(सुनावणी दिनांक १८.१२.२०२४)

अपिलार्थी यांनी दिनांक २३.५.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| ०८.१.२०२२ | वैभव धनवे व प्रकाश गायकवाड यांनी आपल्या कार्यालयास दिलेल्या तक्रार पत्राच्या प्रती मिळणे बाबत इत्यादी |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. माहिती प्राप्त झाले असल्याबाबत अपिलार्थी यांनी पोच दिलेली असल्याने अपील निकाली काढण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगसमक्ष केलेला युक्तीवाद व सादर केलेले कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४४०/२०२२ | 114 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७२ व ७३ | द्वितीय अपील क्रं. ४४४१ व ४४४२/२०२२ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. वैभव ज्ञानोबा धनवे<br>रा. मु. पो. दापका गुंडोपंत ता. मुखेड जि. नांदेड | : | अपिलार्थी |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक<br>पोलीस स्टेशन देगलूर जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय देगलूर जि. नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )**

अपिलार्थी यांनी दिनांक २३.५.२०२२ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अपील क्रमांक | माहिती अर्ज दि. | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|---|
| ४४४१/२०२२ | २३.२.२०२२ | कलम ४(१) व ४(१) क ची आपल्या कार्यालयाने अद्यावत केलेली माहिती |
| ४४४२/२०२२ | २३.२.२०२२ | आपल्या कार्यालयाचा वर्षनिहाय लेखापरिक्षण अहवाल |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले अपील क्रं. ४४४१/२०२२ मध्ये अपिलार्थी यांना माहिती संदर्भातील संकेतस्थळ दि. १५.३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच अपील क्रं. ४४४२/२०२२ मध्ये अपिलार्थी यांना लेखापरिक्षण अहवाल उपलब्ध नाही असे दि. ०३.३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगसमक्ष केलेला युक्तीवाद व सादर केलेले कागदपत्रे विचारात घेता अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

उपरोक्त ०२ द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र./द्वि.अ.क्रं./४४४१ व ४४४२/२०२२ / 115 दि. 7/1/2025

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, छत्रपती संभाजीनगर-४३१००१

| बोर्ड क्रं. ७४ | द्वितीय अपील क्रं. ४५२०/२०२२ |
|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नासेर अली खान जब्बार खान पठाण<br>रा. गंगोत्री ६ स्नेहनगर पोलीस कॉलनी नांदेड | : | अपिलार्थी |
| | विरुध्द | | |
| १. | जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक,<br>पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी क्र.१ |
| २. | प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधीक्षक (मु.)<br>पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड | : | उत्तरवादी क्र.२ |

**( सुनावणी दिनांक १८.१२.२०२४ )**

अपिलार्थी यांनी दिनांक २५.५.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधिताना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहिती अर्जातील विषय थोडक्यात |
|---|---|
| १७.११.२०२१ | लिपीक एस. बी. शाह यांची तत्कालीन पो.अ. नांदेड यांचे आदेशान्वये झालेल्या चौकशी अहवाल मिळणे बाबत |

आज रोजी सुनावणीच्यावेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमोर कथन केले माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि. ०६.१.२०२२ रोजी उत्तर देऊन मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबधित असल्याने ८(१)(त्र) अन्वये माहिती नाकारण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचे समर्थन करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

